# 14 जून रोजी जागतिक अन्न सुरक्षा दिवस

ता. 13 जून 2019
23 ज्येष्ठ 1941

14 जून रोजी जागतिक अन्न सुरक्षा दिवस साजरा करण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासन संचालनालयाने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

संघ राष्ट्रानी डिसेंबर 2018 मध्ये घेतलेल्या परिषदेत 7 जून रोजी जागतिक अन्न सुरक्षा दिवस पाळण्याचे जाहीर केले होते आणि त्यानुसार भारतीय अन्न सुरक्षा आणि दर्जा प्राधिकरणाने सर्व राज्याना 7 जून हा जागतिक अन्न सुरक्षा दिवस पाळण्याचा सल्ला दिला आणि सदर पंधरवडा हा जागतिक अन्न सुरक्षा पंधरवडा पाळण्याचे सांगितले. गोव्यात जागतिक अन्न सुरक्षा पंधरवडा साजरा करण्यासाठी संचालनालयाने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

उद्घाटन समारंभात शाळेसाठी पिवळे पुस्तक आणि ग्राहकांसाठी गुलाबी पुस्तक यांचे प्रकाशन होईल. आहारासंबंधी कार्यसत्राचेही आयोजन करण्यात आले आहे.

या समारंभाची या वर्षाची संकल्पना आहे ङ्गअन्न सुरक्षा ही प्रत्येकांची जबाबदारीङ्ग.

मा/वाप/नामगा/जॉआ/रना/प्रधु/2019/330